I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 180-184
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# दारिद्रय : स्थिती, दुष्परिणाम व उपाययोजना

डॉ. विलास घोडे

सहयोगी प्राध्यापक
बी.पी.नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर

Communicated : 26.03.2022 | Revision : 29.03.2022 Accepted : 02.04.2022 | Published : 02.05.2022

**प्रस्तावना :**

भारतामध्ये जवळपास ७ टक्के लोक दारिद्रयामध्ये जीवन जगत आहे. भारतातील दारिद्रय हे विविध प्रकारच्या समस्यांशी निगडित आहे. दारिद्रय हे माणसांच्या आणि समाजाच्या सर्व पैलूवर परिणाम करणारा घटक आहे आजही दारिद्रय संबंधी निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. भारतामध्ये पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून दारिद्रय निर्मुलनाचे प्रयत्न करण्यात येत आहे.

ज्या व्यक्तींना जीवनावश्यक किमान गरजा किंवा दर्जा टिकवून ठेवता येत नाही त्यांना गरीब असे म्हणतात. त्याचप्रमाणे किमान राहणीमानाचा दर्जा ठेवण्यासाठी किमान उत्पनापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना गरीब असे म्हणतात. भारत सरकारच्या नियोजन मंडळाने जुलै १९६२ साली नेमलेल्या अभ्यास गटाने खाजगी उपभोग खर्चाचे किमान प्रमाण दरडोई दर माणसी २० रुपये असण्याची शिफारस केली होती. नियोजन मंडळाने आता ' उत्पन्न गरिबी पध्दती' चा स्वीकार केला असून ग्रामीण भागात दरडोई २,४०० कॅलरीज व नागरी भागात किमान २१०० कॅलरीजचा उपभोग घेण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न गरिबीच्या मापनासाठी किमान उत्पन्न म्हणून स्वीकारले आहे. या निकषानुसार ग्रामीण भागात दरडोई दरमहा उत्पन्न किमान ४९ रुपये आणि नागरी भागात ५७ (१९७३–७४ च्या किंमतीनुसार) जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. या उत्पन्नाच्या खाली असणारे लोक दारिद्रयरेषेच्या खाली आहेत असे मानले गेले. हा निकष गृहित धरुन १९७३–७४ साली नागरी भागातील ३८.२० टक्के आणि ग्रामीण भागातील ५१.२० टक्के दारिद्रय रेषेखाली आहेत. ग्रामीण आणि नागरी या दोन्ही भागातील लोकांचा एकत्रित विचार करता भारतात १९७७–७८ साली ४८.३० लोक दारिद्रयरेषेखाली होते

भारताला स्वातंत्र होऊन ७४ वर्षात झालेल्या विकासानंतरही जवळजवळ ७ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली हलाखीचे जीवन जगत आहेत. १९९० नंतर भारतात आर्थिक वृध्दी झाली परंतु उत्पन्नाची विषमता कमी झाली नाही. प्रा अमर्त्य सेन यांच्या मते, गरीब हा केवळ असा आर्थिक वर्ग नाही तसेच सामाजिक आणि आर्थिक बदलांचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने अशा गटाची संकल्पनाही सोयीची नाही दारिद्रय म्हणजे भिन्न आणि विविध प्रकारच्या अशा आर्थिक परिस्थितीचा परिणाम आहे आणि त्यामुळे दारिद्रय निर्मूलनाचे धोरण ठरवितांना दारिद्रयाच्या संकल्पनेच्या पलीकडे जाऊन शोध घेणे गरजेचे आहे. समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी गरिबीचे प्रमाण कमी करणाऱ्या उपक्रमाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. दारिद्रयामध्ये आर्थिक पैलू सोबतच मानवाचे आयुष, आरोग्य, राहणीमान, स्वातंत्र, सन्मान, आदर इत्यादी बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

भारतामध्ये सन २०२१ च्या लोकसंख्येनुसार ९७,६९७,७४७ (९७.७ मिलियन) लोकसंख्या दारिद्रय रेषेखालील आहे. त्यामध्ये ४४,८०६,४५५ पुरुष तर ५२,८९१,२९२ स्त्रीया आहेत. निती आयोगाच्या प्रथम नोव्हेंबर २०२१ अहवालानुसार सर्वात कमी दारिद्रयाचे प्रमाण केरळ या राज्यात असून त्याचे प्रमाण ०.७१ आहे. कोटटयाम जिल्हयात कोणत्याही व्यक्तीची नोंद दारिद्रय रेषेखाली नाही. त्यानंतर गोवा (३.७६ टक्के), सिक्कीम(३.८२ टक्के), तामिळनाडू (४.८९टक्के). त्याच प्रमाणे बिहार (५१.९१ टक्के), झारखंड (४२.१६ टक्के) आणि उत्तर प्रदेशमध्ये (३७.७९ टक्के) दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे सर्वात जास्त १०–१४ वयोगटातील व्यक्ती दारिद्रयामध्ये असून त्यांची लोकसंख्या १३,४८०,४०९ एवढी आहे.

**शोध निबंधाचा उद्देश:**

१. भारतातील दारिद्रयाची पार्श्वभूमी व स्थितीचा अभ्यास करणे

२. भारतातील दारिद्रयाचे स्वरुप आणि कारणांचे अध्ययन करणे

३. भारतातील दारिद्रयाचे दुष्परिणाम आणि उपाययोजनांचे विश्लेषण करणे

**अध्ययन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध द्वितीय स्त्रोत तथ्यांच्या आधारावर तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये पुस्तके, मासिके, दै. वृत्तपत्रे इंटरनेटचा माध्यमातून प्राप्त झालेल्या तथ्यांचा आधारावर आशय विश्लेषण करण्याचा प्रयत्न आलेला आहे.

**दारिद्रयाचा संकल्पना :**

मानवी जीवनास आवश्यक असणाऱ्या किमान गरजांच्या अभाव असणाऱ्या परिस्थितीला दारिद्रय असे म्हणतात. काही शास्त्रज्ञांनी दररोज दरडोई २२५० कॅलरी उष्णता निर्माण करण्यासाठी आवश्यक अन्नधान्य खरेदी करण्याची क्षमता ज्या व्यक्तीमध्ये नाही त्यांना आपण गरीब/दारिद्रय समजल्या जातो

ब्रॉडलेच्या मतानुसार, दारिद्रय एक अशी अवस्था आहे की जिच्यामुळे व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नामुळे किंवा अनियोजित खर्चामुळे शारीरिक व मानसिक कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेला जीवनमानाचा दर्जा गाठू शकत नाही. दारिद्रय म्हणजे जीवन जगण्यासाठी कमीत–कमी व अत्यावश्यक गरजाचा अभाव असणे म्हणजे दारिद्रय होय.

ॲडम स्मिथ यांच्या मते,'' जेव्हा व्यक्ती आपल्या सर्वसामान्य गरजा योग्य प्रमाणात भागवू शकत नाही तेव्हा ती स्थिती दारिद्रयपूर्ण स्थिती समजावी''

सन २०२०(२०११–१२) नुसार नीती आयोग ने प्रकाशित केलेल्या नुसार भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदशामध्ये गरिबीचे प्रमाण खालील प्रमाणे आहे

| State/UT | State/UT specific poverty line | | % of population living below the national poverty percentage |
|---|---|---|---|
| | Rural (Rs) | Urban (Rs) | |
| **States** | | | |
| Goa | 1090 | 1134 | 5.09 |
| Kerala | 1018 | 987 | 7.05 |
| Himachal Pradesh | 913 | 1064 | 8.06 |
| Sikkim | 930 | 1226 | 8.19 |
| Punjab | 1054 | 1155 | 8.26 |
| Andhra Pradesh | 860 | 1009 | 10.2 |
| Haryana | 1015 | 1169 | 11.16 |
| Uttarakhand | 880 | 1082 | 11.26 |
| Tamil Nadu | 880 | 937 | 11.28 |
| Meghalaya | 888 | 1154 | 11.87 |
| Tripura | 798 | 920 | 18.05 |
| Rajasthan | 905 | 1002 | 15.71 |
| Maharashtra | 967 | 1126 | 17.35 |
| Gujarat | 932 | 1152 | 17.63 |
| Nagaland | 1270 | 1302 | 18.88 |
| West Bengal | 1783 | 2381 | 19.98 |
| Mizoram | 1066 | 1155 | 20.4 |
| Karnataka | 902 | 1089 | 20.91 |
| All India | 816 | 1000 | 21.92 |
| Uttar Pradesh | 768 | 941 | 29.43 |
| Madhya Pradesh | 771 | 897 | 31.65 |
| Assam | 828 | 1008 | 31.98 |
| Odisha | 695 | 861 | 32.59 |
| Bihar | 778 | 923 | 33.74 |
| Arunachal Pradesh | 930 | 1060 | 34.67 |
| Manipur | 1118 | 1170 | 36.89 |
| Jharkhand | 748 | 974 | 36.96 |
| Chhattisgarh | 738 | 849 | 39.93 |
| Telangana | – | – | – |

I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 180-184
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

| | | | |
|---|---|---|---|
| **Union Territories** | | | |
| *Andaman and Nicobar Islands* | – | – | 1 |
| *Lakshadweep* | – | – | 2.77 |
| *Puducherry* | 1301 | 1309 | 9.69 |
| *Delhi* | 1145 | 1134 | 9.91 |
| *Jammu and Kashmir* | 891 | 988 | 10.35 |
| *Chandigarh* | – | – | 21.81 |
| *Dadra and Nagar Haveli* | – | – | 39.31 |
| *Daman and Diu* | – | – | 9.86 |

**दारिद्रयाचे दुष्परिणाम:**

आज दारिद्रयाच्या समस्यामध्ये कोटयावधी व्यक्ती गुरफटलेले, आहे. दारिद्रय हे सुख, समृध्दि आणि जीवनाचे समाधानामध्ये अडथळा निर्माण करते. तसेच भौतिक, सुख–समृध्दि जीवनापासून वंचित ठेवते. दारिद्रयामुळे व्यक्तीच्या सर्व विकासाच्या पैलूंवर दुष्परिणाम झालेला दिसून येतो.

**शारिरिक परिणाम:** दारिद्रयामुळे व्यक्तीच्या शारिरिक घटकावर परिणाम होतो. आजही अनेक बालके गरिबीमुळे कुपोषण ग्रस्त जीवन जगत असल्यामुळे त्यांच्या शारिरिक वाढ व विकासावर परिणाम झालेला आहे. त्याचप्रमाणे महिलांच्या शारिरिक वाढीवर सुध्दा परिणाम दिसून येतो.

मानसिक परिणाम: व्यक्तीच्या जीवनातील मानसिक घटक महत्वपूर्ण आहे. दारिद्रय वातावरणामुळे व्यक्तीच्या मानसिक विकासासंबंधी समस्या निर्माण होतात. मानसिक विकासासाठी कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण समाधानकारक असणे आवश्यक असते. दारिद्रयामुळे कुटुंबातील वातावरण तणाव, टंचाई आणि अभाव असल्यामुळे त्यांचा परिणाम मानसिक विकासावर होत असतो.

**भिक्षावृत्तीमध्ये वाढ:** सद्यस्थितीमध्ये भिक्षावृत्तीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांचे कारण म्हणजे समाजात मोठयाप्रमाणात आर्थिक, शिक्षण आणि उद्योगधंदे यामध्ये विषमता निर्माण होत आहे. आज वृध्द आणि अपंग व्यक्तीचे प्रमाण भिक्षावृत्तीमध्ये जास्त दिसत असून त्याचप्रमाणे लहान बालके, तरुण महिला व पुरुष वर्गही भिक्षा मागत आहे. ही अतिशय चिंताजनक बाब आहे.

**गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ:** जीवनाचा उदरनिर्वाह करण्यासाठी रोजगाराची नितांत गरज असते. युवकांना रोजगाराची संधी किंवा स्वयंरोजगार नसल्यामुळे दारिद्रयामध्ये जीवन जगावे लागते. त्यामुळे त्यांच्यापुढे जीवन मरणाचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीमध्ये युवक चोरी, लुटमार, खून, दरोडे इत्यादी अनेक गुन्हेगारी प्रवृत्ती कडे वळत असतो. काही दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे लोक गुन्हेगारी प्रवृत्ती कडे वळत असतो. त्यामुळे समाजातील वातावरण चिंताजनक होते.

**वेश्यावृत्तीचे वाढते प्रमाण:** दारिद्रयामुळे निर्माण होणारी वेश्यावृत्तीची समस्या समाजासाठी अत्यंत कलंकित आहे. आजच्या परिस्थितीत तरुण –तरुणींसाठी रोजगाराची जटिल समस्या झालेली आहे. अशा परिस्थितीत तरुणी व महिलांना सन्मान जनक रोजगार मिळणे अतिशय कठिण बाब झालेली आहे. कौटुंबिक जबाबदारी, जीवनामधील आपत्ती आणि मदतीचा अभाव व आर्थिक असहकार्य इत्यादी अनेक संकटामुळे तरुणी व महिला वेश्यावृत्तीकडे गेलेल्या आहेत.

**व्यसनाधिनता:** सद्यपरिस्थितीमध्ये युवकांमध्ये मोठया प्रमाणात व्यसनाधिनता वाढत आहे. आज समाजातील युवकांकडे शिक्षण आहे तर रोजगार नाही. आर्थिक परिस्थितीही मजबूत नसल्यामुळे स्वंयरोजगार सुरु करता येत नाही. त्यामुळे आजच्या युवक चिंता, नैराश्य, उदासिनता अशा वातावरणामुळे युवक वर्ग व्यसनाच्या आहारी गेलेला आहे. दारिद्रया मध्ये जीवन जगत असून व्यसन करण्यामध्ये युवक अग्रेसर आहे. आजच्या व्यसनामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झालेले आहे. त्यामुळे सामाजिक वातावरण बिघडलेले आहे.

**बालगुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ:** भारतामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणानुसार साधन संपत्ती, रोजगाराचा अभाव दिसून येत आहे. आजही शारिरिक दृष्टया सुदृढ व्यक्तीला रोजगार मिळत नाही. त्याचप्रमाणे कुटुंबात लहान मुलांची संख्या जास्त असणे, कौटुंबिक जबाबदारी व कलह, शिक्षणाचा अभाव अशा अनेक कारणामुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. तसेच कुटुंबातील आर्थिक अडचणीमुळे काही कुटुंबातील मुले बालगुन्हेगारी वळत आहे.

**आत्महत्याचे वाढते प्रमाण:** भारतामध्ये दिवसेंदिवस आत्महत्याचे प्रमाण वाढत असून ही चिंतनीय बाब आहे. मध्यम वर्गीय लोकांमध्ये तसेच वृध्द लोकांमध्ये आत्महत्या

वाढत आहे. आजही अनेक कुटंबातील व्यक्तींला पोटभर अन्न मिळत नाही तसेच त्यांच्या अत्यावश्यक गरजाही पूर्ण होत नाही. त्यांना आयुष्यभर दारिद्रयामध्ये जीवन जगावे लागते. दिवसेंदिवस वाढत असलेल्या समस्यांना कंटाळून अनेक व्यक्ती आत्महत्याचे मार्ग स्वीकारात तसेच काही कुटुंबातील व्यक्ती दारिद्रयाला कंटाळूनसुध्दा सामुहिक आत्महत्या सुध्दा करित आहे.

**दारिद्रय निर्मूलनार्थ उपाययोजना:**

भारतातील दारिद्रयाची स्थिती अतिशय गुंतागुतीची आहे. कारण दारिद्रयासाठी कोणत्याही एका घटकाला गृहित धरता येत नाही. दारिद्रय जीवनाच्या सर्वव्यापी घटकाशी संबंधीत आहे. तरी काही उपायांद्वारा दारिद्रय निर्मूलन करणे शक्य आहे

**आर्थिक विकासाची संधी निर्माण करणे:** भारतीय समाज व्यवस्था पूर्वी वर्ण व्यवस्थेवर आधारीत होती. त्याच प्रमाणे विविध जाती धर्माचा समावेश आहे. आजही काही जातीतील व्यक्ती मोठया प्रमाणात श्रीमंत असल्याचे दिसून येतात. तसेच मागावर्गीय प्रवर्गात आजही मोठया प्रमाणात दारिद्रयाचे प्रमाण दिसून येते. समाजात आर्थिक विषमता मोठया प्रमाणात असल्यामुळे समाजातील सर्व जातीतील लोकांना आर्थिक विकासाची संधी समानतेचे मिळत नाही. मागासवर्गीय लोकांसाठी शासन स्तरावर विविध महामंडळाची स्थापना करुन रोजगाराची आणि कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक विकासासाठी सर्वांसाठी रोजगाराभिमुख कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे

**आर्थिक विषमता कमी करणे:** शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये आजही दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. तसेच शहरी आणि ग्रामीण भागामध्ये मोठया आर्थिक विषमताही दिसून येते. ग्रामीण भागातही जमीन मालकीची विषमता दिसून येत असली तरी काही विशिष्ट लोकांकडे मोठया प्रमाणात जमीनी आहेत. जमीनीची आर्थिक विषमता कमी करण्यासाठी समाजसुधारक विनोबा भाव यांनी भूदान चळवळी राबवून आणि कमाल भू–धारणा कायदा अंमलात आणून भूमीहीनास जमीन देण्याचा प्रयत्न केला. तसेच आजही दारिद्रयामध्ये असलेल्या लोकांसाठी सबसीडी आणि विविध योजना राबवून समाजातील आर्थिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे:** देशातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे हे शासना समोर मोठे आव्हान आहे. दारिद्रय कुटुंबातील लोकांना रोजगार मिळाला तर खात्रीपूर्वक त्यांचा कुटुंबाचा विकास होईल. परंतु आज शिक्षणाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असून रोजगाराचे क्षेत्रे त्या प्रमाणात वाढलेले नाही त्यामुळे केंद्र सरकार आत्मनिर्भरतेची संकल्पना अंमलात आणून रोजगारीची संधी निर्माण करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**किमान वेतनाची हमी:** सद्यस्थितीत कामगारांमध्ये संघटित आणि असंघटित क्षेत्र दिसून येते. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या सोयी–सुविधा मिळतात. परंतु आजही असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्या सोयी–सुविधापासून वंचित राहावे लागते. दारिद्रय रेषेखालील लोक जास्त प्रमाणात असंघटित क्षेत्रात काम करीत असल्यामुळे त्यांना किमान वेतनाची हमी नसल्यामुळे त्यांचा गरजा भागवू शकत नाही त्यामुळे त्यांना किमान वेतनाची हमी मिळाल्यास दारिद्रयाचे प्रमाण कमी होईल.

**सामाजिक सुरक्षा व विमायोजना :** देशातील नागरिकांचे सुरक्षा व संरक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. दारिद्रयामध्ये जीवन जगत असणाऱ्या व्यक्तींना सुरक्षा व विमा योजना अंतर्गत त्यांच्या किमान गरजा भागविण्याची तरतुद करण्याची व्यवस्था केली पाहिजे जेणे करुन त्यांच्या दारिद्रयाचे प्रमाण कमी होईल.

**मद्यपानावर निर्बंध लावणे:** सद्यस्थितीमध्ये व्यसनाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेले आहे. शासनाचेही धोरण मद्यपानाचे प्रमाण वाढविण्याचे दिसून येत आहे. शासन महसूल वाढविण्यासाठी मद्यपानावरचे नियम व निर्बंध शिथिल करीत आहे. समाजातील गरीब आणि दारिद्रय रेषेखालील लोक विविध संकटांनी ग्रासलेले असून तणावामध्ये जीवन जगत आहे जीवनासंबंधी उदासिनता, असुरक्षितता वाटत असल्यामुळे व्यसनाच्या आहारी गेलेले आहे त्यामुळे मद्यपान करण्याचे दिवसेंदिवस वाढत असून ही चिंतनीय बाब आहे. मद्यपानावरी निर्बंध व नियम कठोर करुन गरिब लोकांना मद्यपानापासून दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**आवासाची योजना आणि शिक्षणाच्या सोयी– सवलती :** दारिद्रय रेषेखाली राहत असलेले कुटुंब आर्थिक दृष्टिने सक्षम नसतात. त्यामुळे गलिच्छ वस्तीमध्ये वास्तव्य व उदरनिर्वाह करावे लागते. सोबत इतर सामान्य व्यक्तीप्रमाणे त्यांनी निवासाचे समाधान मिळत नाही. त्यामुळे शासनाद्वारे म्हाडा गृहनिर्माण सोसायटी, इंदिरा गांधी आवास योजना, रमाई घरकुल योजना अशा स्वरुपाच्या योजना राबवून दारिद्रय रेषेखालील लोकांना निवासाची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. तसेच शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे त्यामुळे दारिद्रय रेषेखाली विद्यार्थ्यांसाठी मोठया प्रमाणात शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे.

**शेती व्यवसायाला प्रोत्साहन देणे:** भारतामध्ये आजही शेती व्यवसाय मोठया प्रमाणात केल्या जाते. परंतु भारतामध्ये मोठया प्रमाणात कोरडवाहू शेती असुन नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांवर अवंलबून आहे. भारतातील कोरडवाहू शेती ओलिताच्या शेतीमध्ये परिवर्तीत करुन शेती व्यवसायाचे क्षेत्र विकसित करता येईल. तसेच शेतीच्या विकासासंदर्भात वीज, बी—बियाणे, खते, किटकनाशके, पाण्याची सोय, तंत्रज्ञानांची सुविधा, पिकांसंबंधी मार्गदर्शन, पीक विमा, शेती उत्पादनाला हमी भाव, कमी दरामध्ये कर्जपुरवठा, शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, नैसर्गिक आपत्तीसंबंधी संरक्षण इत्यादी शेती व्यवसायसंबंधी सोयी—सुविधा उपलब्ध करुन शेती व्यवसायाला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्रय व बेराजगारीचे प्रमाण कमी होईल.

**सहकारी सोसायटी /संस्थांची स्थापना:** सहकार्यातून सर्वागिण विकास होत असतो. शेतीसाठी आणि इतर व्यवसायाठी लागणारे भाग भांडवल उभे करण्यासाठी सहकारी संस्थांची महत्वाची भूमिका आहे. तसेच सहकारी सोसायटीच्या माध्यमातून लोकांचा बचतीची सवय लागते तसेच संकटकाळी आर्थिक मदतही मिळते. अशा या उपक्रमातून ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमाण कमी होऊ शकते.

**जन्मदरावर नियंत्रण ठेवणे:** जागतिक स्तरावर भारताचा लोकसंख्येच्या तुलनेत द्वितीय क्रमांक असुन प्रत्येक दिवसाला ६७,३८५ बालके जन्माला येतात. सन २०१८ नुसार मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश मधील ग्रामीण भागातील जन्मदर २६.६ होता. आजही भारतामध्ये जन्मदरातुलनेत विकासाच्या संधी निर्माण होत नाही. दिवसेंदिवस नैसर्गिक साधन संपत्ती कमी—कमी होत आहे. अशा परिस्थितीमध्ये जन्मदरावर नियंत्रण ठेऊन देशातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे अत्यावश्यक आहे.

**अनावश्यक आर्थिक व्यवहारावर प्रतिबंध:** भारतीय समाजा मध्ये अनेक प्रथा, परंपरा, रितीरिवाज, अंधश्रध्दा, सण उत्सव सुरु असतात. अनेक गरिब व्यक्ती आर्थिक स्थिती हालाखीची असतांनाही नवस, मोठया खर्चात विवाह इत्यादी अनेक कार्यक्रम करीत असतात. त्यामुळे अनावश्यक आर्थिक व्यवहार मोठया प्रमाणात होऊन कर्जबाजारी होत असतात. अति कर्जबाजारीपणामुळे व्यक्ती दारिद्रयाकडे जाऊ शकतो. त्यामुळे आवश्यकतेनुसार आर्थिक व्यवहार केल्यास दारिद्रयाचे प्रमाण कमी होईल.

**दारिद्रय निर्मुलनार्थ शासकीय कार्यक्रम:** साधारणत: सन १९६० च्या दशकापासून दारिद्रय निर्मुलनार्थ शासकीय स्तरावर विविध कार्यक्रमाची व योजना आरंभ करण्यात आला. त्यामध्ये आर.आर.डी.पी, टी.आर.वाय.एस.ई.एस, एन.आर.ई.पी., अंत्योदय कार्यक्रम, आर.एल.ई.जी.पी., जवाहर रोजगार योजना, स्वर्णजयंती ग्रामीण स्वरोजगार योजना, अन्नपूर्ण योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, राष्ट्रीय वृध्द नागरिक पेशन योजना इत्यादी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी विविध योजनांचा शुभारंभ करुन दारिद्रय निर्मुलन करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

**निष्कर्ष :**

जगातील सर्व विकसनशील देशामध्ये दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. दारिद्रय निर्माण होण्याचे अनेक कारणे आहेत. कुटुंबातील सदस्य संख्या जास्त, अज्ञानता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव आणि कमी उत्पन्न अशा परिस्थितीत दारिद्रय निर्माण होते. भारतात दारिद्रय निर्मुलनाचे कार्यक्रम जवळपास सन १९८० पासून राबवित आहे. परंतु आजही दारिद्रय लोकसंख्येचे प्रमाण पाहिजे तसे कमी झालेले नाही. ग्रामीण भागात मोठया प्रमाणात दारिद्रय रेषेखाली लोकांची संख्या जास्त आहे. शेती संदर्भात विविध पुरक योजना राबवून ग्रामीण भागातील युवकांना रोजगारी संधी निर्माण करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच खेडयातील परिस्थिती आत्मनिर्भर बनविण्यासाठी स्वंयरोजगाराची संधी निर्माण केल्या जात आहे. आजही शासनाकडून विविध योजना, अन्न धान्य, सबसिडी, विविध उपक्रमे राबवून गरिब लोकांना मदत केली जात आहे. आत्मनिर्भर भारत आणि कौशल्य युक्त शिक्षणाचे उपक्रम राबवून दारिद्रय रेषेखालील लोकांचे जीवनस्तर उंचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच शिक्षणच्या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करुन रोजगारभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आजच्या युवकांनीही रोजगारभिमुख शिक्षणाकडे लक्ष देऊन आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

सामाजिक समस्या : राम आहूजा

भारतातील समकालीन सामाजिक समस्या : माणिक माने

भारतीय सामाजिक समस्या : प्रा. डॉ. सुनिल मायी

आधुनिक भारतातील सामाजिक समस्या : डॉ दिलीप खैरनार

भारतीय समाज समस्या आणि प्रश्न: डॉ. एस.आर. तोष्णीवाल

ग्रामीण विकास सिध्दान्त, नीतियॉं एवं प्रबन्ध : कटार सिंह